पुस्तक उपेक्षेने संपवू नका...

'द फौंडेशन ऑफ टिळक्स नॅशनॅलिझम्' या परिमला व्ही. राव यांच्या बहुचर्चित पुस्तकाचा परिचय

दत्तप्रसाद दाभोळकर



प्रतिगामी मंडळी एक मजेशीर खेळी खेळतात. पुरोगामी, परिवर्तनवादी महानायकांना प्रयत्न ते उपेक्षेने संपविण्याचा प्रयत्न करतात. ते उपेक्षेने संपले नाहीत, तर त्यांना उपहासाने संपविण्याचा प्रयत्न करतात. मात्र, ते उपहासाने संपले नाहीत, तर त्यांना कापून छानपैकी आपल्या चौकटीत बसवतात! ते आणि आम्ही एकच. किंवा खरंतर त्यांचा विचार बरोबर घेऊन, त्यांना गुरुस्थानी मानून आम्ही आमचा प्रवास करतोय असे सांगण्याचा प्रकार.

महात्मा फुलेंच्याकडे प्रथम पुण्याने पूर्णपणे दुर्लक्ष केले. हे प्रकरण असे उपेक्षेने संपणार नाही, हे लक्षात आल्यावर चिपळुणकरांनी आपल्या निबंधमालेत लिहिले, 'या फुलेंना निबंध म्हणजे काय हे तरी माहीत आहे का? हे म्हणे निबंध लिहिताहेत! त्यांना हवे ते लिहू दे. हा ज्योती म्हणजे मोहरीचे दोन दाणे! या पारड्यात पडले काय आणि त्या पारड्यात पडले काय, कुणाला काय फरक पडणारे?- आज मात्र चिपळुणकर म्हणजे कृष्णशास्त्री की विष्णुशास्त्री हेसुद्धा कुणाला सांगता येणार नाही. मात्र, परिवाराच्या समरसता मंचावर एका बाजूला गुरु गोळवलकर, दुसऱ्या बाजूला डॉ. हेडगेवार आणि मध्ये ज्योतिबांचा फोटो अशी रचना असते. खरंतर ही आनंदाची गोष्ट आहे. परिवाराने महात्मा ज्योतिबा फुलेंना स्वीकारले, तर या देशातील परिवर्तनाची लढाई पूर्णपणे यशस्वी होते आणि संपते. मात्र, असे काही अजिबात होत नाही. यात असते 'ग्यानबाची मेख' महात्मा फुलेंना हवे तसे कापून आपल्या चौकटीत बसवलेले असते. अर्थात यामुळे आपले काही फारसे बिघडत नाही. महात्मा फुलेंनी नेमके काय सांगितलंय हे आपल्याला माहीत असते. पाच-दहा टक्के फुलेसुद्धा यांना झेपणार नाहीत, हे आपणाला माहीत असते. आपण थोडे हसतो आणि बाजूला होतो.

मात्र, ही खेळी सनातनी मंडळी फार यशस्वीपणे खेळतात. ते त्यांनी स्वामी विवेकानंदांच्याबद्दल केलंय. सर्व धर्म परिषदेत आपला प्रतिनिधी म्हणून हिंदू धर्माने त्यांना पाठविले नव्हते. खरंतर 1893मध्ये अमेरिकेत होणारी सर्व धर्म परिषद ही त्यावेळच्या जगातील एक फार मोठी घटना होती. कोलंबस अमेरिकेत येऊन चारशे वर्षे झालीत म्हणून हा अतिभव्य सोहळा आयोजित केलेला होता. तीन वर्षे त्याची तयारी सुरू होती. जगातील बहुतेक सर्व धर्मांचे प्रतिनिधी तेथे होते. हिंदू धर्माने मात्र आपला प्रतिनिधीच पाठविला नव्हता. कारण वाटेत होता समुद्रप्रवास! हिंदू धर्म बुडविणारा! विवेकानंद स्वत:च आपल्या तंद्रीत जाऊन 11 सप्टेंबर 1893 रोजी सर्व धर्म परिषदेच्या उद्‌घाटन सत्रात बोलले. त्यांचे ते पाच मिनिटांचे भाषण जगभर गाजले. पण सनातनी हिंदू धर्माने काय केले? त्यांना उपेक्षेने मारण्याचा प्रयत्न केला. आपली ही वेदना विवेकानंदांनी अमेरिकेतून 20 जून 1894 रोजी हरिदास बिहारीलाल देसाई यांना पत्र पाठवून कळविली आहे. ते पत्रात लिहितात, 'मी हिंदूंचा प्रतिनिधी आहे, असे अमेरिकन लोकांना स्पष्ट सांगण्यासाठी आपल्या हिंदू बांधवांनी काहीदेखील प्रयत्न केलेला नाही. उलटपक्षी हे लोक अमेरिकन लोकांना सांगत आहेत, की मी एक पक्का भोंदू माणूस असून, अमेरिकेत आल्यावर मी संन्याशाची वस्त्रे परिधान केली आहेत. इथे येऊन मला एक वर्ष झाले, पण या अवधीत एकाही प्रसिद्ध व्यक्तिला 'हा फसवेगिरी करणारा माणूस नाही.' असे माझ्याबाबत येथील लोकांना कळवावेसे वाटले नाही.'

मात्र, 1897च्या जानेवारीत विवेकानंद भारतात परत आल्यावर त्यांचे जे भव्य सत्कार झाले. त्यावेळी हे प्रकरण आता उपेक्षेने संपणार नाही, त्यांना उपहासाने संपविले पाहिजे, हे या मंडळींच्या लक्षात आले. बंगवासी या कलकत्त्यातील नियतकालिकाने लिहिले, 'विवेकानंद हे शुद्र असल्याने त्यांना मुळात संन्यास घेण्याचाच अधिकार नाही आणि आता तर ते समुद्र प्रवास करून भ्रष्ट झाले आहेत.' महामहोपाध्याय गोपाळशास्त्री कराडकर यांनी वेदशास्त्रसंपन्न त्र्यंबकशास्त्री वैद्यांना सांगितले, 'हा माणूस शुद्र आहे. त्यात त्याने समुद्र प्रवास केलाय. त्यामुळे आता त्याला प्रायश्चित्य देऊनसुद्धा शुद्ध करता येणार नाही.'

हे विचार कृतीत परावर्तीत होत होते. 27 फेब्रुवारी, 1898 रोजी श्रीरामकृष्णांचा जन्मदिवस दक्षिणेश्वरच्या मंदिरात साजरा करण्यासाठी विवेकानंद भगीनी निवेदिता आणि धीरामाता यांच्याबरोबर गेले. मात्र, दरवाजावरच त्यांना बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला. तुम्हाला प्रवेश देऊन आम्ही या मंदिराचे पावित्र्य भ्रष्ट करणार नाही म्हणून सांगितले. विवेकानंदांना निमुटपणे दरवाजातून परत फिरावे लागले.

14 सप्टेंबर, 1899 रोजी श्री. ई. टी. स्टर्डी यांना पत्र पाठवून आपण कोणत्या यातनांच्यामधून जात आहोत, हे विवेकानंदांनी कळविले आहे. पत्रा विवेकानंद म्हणतात, 'भारतात पाय ठेवल्यापासून लोकांनी मला मुंडन करावयास लावले आणि कफनी घालण्याची सक्ती केली. त्याचा परिणाम म्हणून माझे मधुमेह वगैरे विकार बळावले. अर्थात हे सर्व माझ्याच कर्माचे फळ आहे आणि त्याबद्दल मला आनंद आहे. कारण त्यामुळे काही काळ तीव्र वेदना होत असल्या तरी आयुष्यात एक फार मोठा अनुभव मिळतो. अर्थात माझ्या स्वत:बद्दल सांगावयाचे म्हणजे मी माझ्या स्वभावानुसार आणि तत्त्वानुसार वागणे सोडणार नाही.'

धर्मांध शक्तींनी निर्माण केलेले वातावरण एवढे भयंकर होते, की विवेकानंदांनी 1897-98मध्ये बेलूर मठाची स्थापना केली. त्यावेळी त्यासाठी एकाही धनिकाने वा संस्थानिकांनी एका पैशाचीही देणगी दिली नाही. बेलूर मठासाठी गंगेच्या काठी विस्तृत जागा विकत घेण्यासाठी लागलेली सर्व रक्कम हेनरिटा मुल्लर यांनी दिलेली आहे. त्या विवेकानंदांच्या शिष्या नाहीत, तर त्यांची मैत्रीण आहेत. हेनरिटा मुल्लर या लंडनमध्ये स्त्रीमुक्ती आणि समाजवाद या रचनेवर काम करीत होत्या. बेलूर मठाच्या दैनंदिन खर्च चालावा म्हणून पैसे जमवणे गरजेचे होते. त्यांनी सर्वाधिक रक्कम श्रीमती सारा ओली बुल यांनी दिली आहे. - मात्र, बेलूर मठ कार्यरत झाल्यावर 'मठ असा नसतो. हे विवेकानंदाचे खाजगी उद्यानगृह आहे', म्हणून

कलकत्ता महानगरपालिकेने त्यावर भला मोठा कर आकारला. विवेकानंदांचा मृत्यू 4 जुलै, 1902 रोजी सायंकाळी आठ वाजता झाला. मात्र, दुसऱ्या दिवशीच्या कलकत्त्याच्या कुठल्याही वृत्तपत्रात त्याची साधी बातमीही आलेली नाही. कलकत्ता महानगरपालिकेत श्रीरामकृष्णांच्या मृत्युची नोंद आहे. विवेकानंदांच्या मृत्युची नोंद नाही आणि बेलुर मठाने विवेकानंदांची जी श्रद्धांजली सभा आयोजित केली होती, त्यात आमंत्रण दिलेल्या कलकत्ता उच्च न्यायालयाच्या दोन्ही न्यायाधिशांनी सहभागी होणे नाकारले.

आज मात्र विवेकानंदांनी सर्व धर्म परिषदेत हिंदू धर्माचा झेडा त्रिखंडात फडकवीला हे आपल्या मनावर वज्रलेप करण्यात आले आहे, आणि हे केवळ येथेच थांबलेले नाही. काही वर्षांपूर्वी साऱ्या भारतभर भिंतींच्यावर भली मोठी पत्रके चिटकवली होती. त्यात ठळक अक्षरात लिहिले होते, 'विवेकानंद सांगताहेत, देशातील साऱ्या मुसलमानांना अरबी समुद्रात बुडवा.' गोखेत्सनेही लाजेने मान खाली घालावे, असे जहरी प्रचार विवेकानंदांच्या नावावर केले जाताहेत.

मात्र, खरी परिस्थिती किती वेगळी आहे. विवेकानंदांनी हिंदू धर्मावर घणाघाती टीका केली आहे. इस्लामचा गौरव केलाय आणि या देशाचा अभ्युदय करावयाचा असेल, तर हिंदू-मुसलमान सहकार्य नव्हे, तर समन्वय ही पूर्वअट आहे म्हणून सांगितलंय. 'आजचा हिंदू धर्म हा धर्म नव्हे, हे आहे सैतानाचे तांडव म्हणून आपल्या पत्रामधून आपल्या शिष्यांना आणि गुरुबंधूंना सांगणाऱ्या विवेकानंदांनी अनेक पत्रांमधून त्यावर विवेचन केलंय. 17 ऑगस्ट, 1889 रोजी पूज्यपादांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी म्हटलंय, 'आपल्या देशातील प्राचीन मतानुसार जाती व्यवस्था ही वंशगत मानलेली आहे आणि स्पार्टा देशातील लोकांनी तेथील गुलामांच्यावर अथवा अमेरिकेतील लोकांनी तेथील निग्रोंच्यावर जेवढे अत्याचार केले आहेत, त्यापेक्षा अधिक आपण आपल्या देशातील शूद्रांवर केले आहेत.' 20 ऑगस्ट, 1893 रोजी अळसिंगा पेरुमल यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी म्हटलंय, 'हिंदू धर्माइतका इतर कोणताही धर्म अगदी ओरडून सारी माणसे एक म्हणून सांगत नाही. आणि हिंदू धर्म गरीब आणि खालच्या जातीच्या लोकांना जितके पायाखाली तुडवितो तितके जगातील कोणताही धर्म तुडवत नाही.' 1895मध्ये संमतीवयाच्या कायद्याची चर्चा होत असताना त्यांनी ब्रह्मानंदांना पत्र पाठवून सांगितले, 'आम्ही संमती वयाच्या कायद्याला विरोध केला, तर तुम्ही धर्म बुडवताय असे सांगताहेत. अरे मुलगी वयात येण्यापूर्वी तिला आई बनवायला निघालेल्या समाजाला कसला आलाय धर्म! काहीजण सांगताहेत, आमच्या धर्मात बालविवाह नव्हतेच. मात्र मुसलमान आक्रमकांच्यापासून आमच्या मुलींचे रक्षण करायला आम्ही बालविवाह सुरू केले. अरे आपण किती खोटे बोलणार आहोत? मी सर्व ब्राह्मण ग्रंथ वाचलेत. सर्व गृह्यसूत्रे वाचलीत. त्यात मुलींच्या लग्नाच वय अगदी लहान असावे, असे लिहिलंय. आपल्या मुर्खपणाला आपण मुसलमानांना का म्हणून जबाबदार धरतोय? खरे तर शिंप्यांनी शिवलेले कपडे घालावेत, हे आपण मुसलमानांच्याकडून शिकलोय. रस्त्यावर माशा घोंगावणारे अन्न खाण्यापेक्षा अन्न स्वच्छपणे कसे खावे, हे आपण मुसलमानांकडून शिकलो असतो, तर किती बरे झाले असते?'

या प्रश्नांची मांडणी विवेकानंदांनी नंतर अधिक भेदकपणे केली आहे. 20 सप्टेंबर, 1892 रोजी पंडीत शंकरलाल शर्मा यांना पाठविलेल्या पत्रात आणि नोव्हेंबर 1894 रोजी हरीदास बिहारीलाल देसाई यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी अगदी स्पष्टपणे सांगितलंय, 'या देशातील धर्मांतरे ख्रिश्चन आणि मुसलमान यांनी केलेल्या अत्याचारांमुळे नव्हे, तर उच्चवर्णीयांनी केलेल्या अत्याचारामुळे झालीत.' 10 जून, 1898 रोजी सर्फराज मोहमद हुसेन यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी सांगितले, 'आमच्या अद्वैत वेदांतातील सिद्धांत कितीही सूक्ष्म आणि सुंदर असले तरी समतेचा संदेश सर्वप्रथम व्यवहारात आणलाय तो इस्लामनेच. आम्ही व्यवहारातील समता तुमच्याकडून शिकली पाहिजे.'

मुसलमान राजवट वाईट होती. त्यांनी अत्याचार केले, याचे विवेकानंदांनी खंडन केले आहे. 'भारताचा ऐतिहासिक क्रमविकास' या आपल्या निबंधात त्यांनी लिहिलंय, 'मोगलांच्या दरबारात जे बौद्धिक वैभव होते, त्याचा अंशमात्रसुद्धा आपल्या पुण्याच्या आणि लाहोरच्या दरबारात दिसत नाही.' आणि 'भारताचा भावी काळ' या निबंधात त्यांनी सांगितले, 'भारतातील मुसलमान राजवटीचे योगदान हे, की गरीबांची आणि दलितांची स्थिती सुधारली. आणि विशेषाधिकार संपले.' भगिनी निवेदितांनी 'मला प्रतित झालेले माझे गुरु' म्हणून जे पुस्तक लिहिलंय त्यात त्यांनी सांगितलंय, 'हिंदू मुसलमान समन्वयाशिवाय भारत ही कल्पनाच विवेकानंद करू शकत नव्हते. एकदा बोलताना ते म्हणाले, 'मोगल सम्राट शहाजहानला तुम्ही परकीय म्हटलंत तर त्याच्या कबरीतसुद्धा त्याचा थरकाप उडेल.'

परिवर्तनाच्या चळवळीतील अग्रदूत असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले आणि स्वामी विवेकानंद यांना प्रतिगामी मंडळी प्रथम उपेक्षेने आणि नंतर उपहासाने संपविण्याचा प्रयत्न कसा करतात आणि नंतर जनसामान्यांची दिशाभूल करून, या महानायकांना हवे तसे कापून आपल्या चौकटीत कसे बसवितात, हे आपण पाहिले. मात्र, यापेक्षा अधिक भयावहपणे

हे पुस्तकांच्या बाबत केले जाते.

'विचार हा आमच्या अस्तित्वाचा आधार आहे.' असे सांगत मिरविणारे विचारवंत आपल्याला अडचणीत आणणारी पुस्तके उपेक्षेने संपविण्याचा प्रयत्न करतात. हे लेखांच्याबाबत होते, हे तसे आपणाला माहीत आहे. सत्यकथेत मे. पु. रेगे यांनी लिहिलेल्या लेखाला साधे उत्तर देण्याचे सौजन्यही नरहर कुरुंदकरांनी वा त्यांच्या शिष्यांनी दाखविले नाही. यामागे केवळ पळपुटेपणा किंवा टोकाचा अहंकार असतो. असे नव्हे, तर उपेक्षेने विचार संपविता येतो हा विचार असतो.

अनेक अडचणीत आणणाऱ्या पुस्तकांच्याबाबत हे केले जाते! आपण दोन अतिशय महत्त्वाची पुस्तके लक्षात घेऊया. नानाजी देशमुख आणि अटल बिहारी वाजपयी हे संघ परिवारातील चाणक्य आणि चंद्रगुप्त. त्या दोघांनाही भारतरत्न या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित करण्यात आलेले आहे. लोहपुरुष सरदार पटेल यांनी गुरु गोळवलकरांच्याकडून 'संघ ही सांस्कृतिक संघटना आहे. राजकारणाशी तिचा संबंध नाही.' असे लिखित वचन घेतले होते. बलराज मधोक यांनी त्यांच्या 'हिंदू स्टेट' या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे सरदार पटेलांना कात्रजचा घाट दाखवत संघाने जनसंघ स्थापन केला. जनसंघ स्थापन झाला, त्यावेळी शामाप्रसाद मुखर्जीचे प्रमुख सहकारी म्हणून बलराज मधोक त्यांच्याबरोबर होते. अडवानी त्यावेळी मधोकांचे सेक्रेटरी होते. मधोक नंतर जनसंघाचे खासदार झाले. ते जनसंघाचे अध्यक्षही होते. दीन दयाल उपाध्याय त्यांचे अगदी जवळचे मित्र होते. दीनदयाळ उपाध्याय यांचा रात्रीच्यावेळी रेल्वेतून पडून अनाकलनीय रीतीने अकल्पीत मृत्यू झाला. त्यानंतर बलराज मधोक यांनी एक सविस्तर पुस्तक लिहिले. 'दीन दयाळांचा मृत्यू हा अपघात नसून नानाजी देशमुख आणि अटल बिहारी वाजपेयी यांनी केलेला खून आहे, म्हणून सविस्तर मांडणी करणारे.' हे पुस्तक उपेक्षेने मारण्यात आले. ते पुस्तक बाहेर कुणाच्या हातातच पडणार नाही, याची पुरेपूर काळजी घेण्यात आली. या पुस्तकातील मांडणीची चर्चा करण्यासाठी एकदा मी, विजय तेंडुलकर व राजीव खांडेकर असे तिघेजण मधोकांच्या घरी गेलो होतो. मधोक सारा कट कसा रचला, कसा कार्यान्वित केला हे आम्हाला दोन तास समजावून देत होते. आम्ही परत निघालो. त्यावेळी मधोक म्हणाले, 'अरे हे असे पुस्तक लिहिलंय म्हणून माझ्यावर खटला भरा. नाहीतर पुस्तकाचा प्रतिवाद करा. मात्र, आज असे काहीच होणार नाही, हे पुस्तक उपेक्षेने संपविले जाईल!' खरंतर मधोक पुस्तक आपल्या पैशांनी प्रसिद्ध करत होते. पण ते फक्त मित्रांना वा वृत्तपत्रांना पुस्तक भेट देत होते. पुस्तकाची पोच न देणे व त्याच्यावर परिक्षण न छापणे संपादकांच्या मर्जीवर अवलंबून होते. पुस्तक विक्रेते पुस्तक ठेवण्यास नकार देत

शब्द PUBLICATION

मूल्य ४२५/-

उजव्या सोंडेच्या बाहुल्या ही प्रवीण दशरथ बांदेकर यांची *चाळेगत* नंतरची दुसरी कादंबरी. पहिल्या कादंबरीत बांदेकरांनी चाळेगतीचे अस्तित्व व्यवस्थेच्या प्रस्थापित स्वरूपात शोधले होते. *उजव्या सोंडेच्या बाहुल्या* मध्ये बांदेकर अधिक सूक्ष्म आणि अमूर्त पातळीवरील प्रक्रियांमध्ये उतरतात. या प्रक्रिया मानवी अस्मितेच्या जडणघडणीशी आणि तिच्याशी जोडलेल्या विविध समस्यांशी निगडित आहेत. हेच या कादंबरीचे केंद्रवर्ती आशयसूत्र आहे.

आत्यंतिक वेगाने भर पिकावर रोग पसरत जावा असे काहीतरी अस्मितेच्या जडणघडणीत आज घडत आहे. संपूर्ण समाजच्या समाज आणि विशेषत: या समाजातील बुद्धिजीवी मध्यमवर्ग गतानुगतिकतेकडे प्रवास करतो आहे. माणसं बधिर होत आहेत. लोळागोळा होऊन प्रतिगामित्वाच्या चिखलात ती रुतत आहेत.

ही कादंबरी म्हणजे प्रचलित संवेदनशीलतेमध्ये अप्रस्तुत होत गेलेल्या आधुनिकतेच्या प्रकल्पावरचे, मूल्यव्यवस्थेच्या विराट अध:पतनावरचे अस्वस्थ करणारे भाष्य आहे. या भाष्याचे वेगवेगळे स्तर, त्यांच्यामध्ये होणारी गुंतागुंत, तिच्यात अडकलेली मानवी आयुष्ये हे सारे बाहुल्यांच्या खेळाच्या पारंपरिक संकल्पनेला विलक्षण सर्जनशील करत प्रवीण दशरथ बांदेकरांनी मूर्त केले आहे.

उजव्या सोंडेच्या बाहुल्या (कादंबरी)
प्रवीण दशरथ बांदेकर

होते. एक-दोन पुस्तक विक्रेत्यांनी ठेवले पण त्यांचा अनुभव भयंकर होता. ही गोष्ट नव्वद सालची. आज आपण तीस वर्षे पुढे आलोय!

विचारांचा मुकाबला विचारांनी करावयाचा असतो. मात्र, तसे होत नाही. म्हातारीने कोंबडे झाकावयाचा कार्यक्रम पुस्तक क्षेत्रात मात्र यशस्वी होतो. किंवा उजाडले तरी सूर्य कुठे आहे, असे म्हणत पुस्तके किंवा विचार अंधारात लोटले जातात. खरंतर आपण हे सर्व महानायकांच्या बाबत करतो. अडचणीत आणणारे मुद्दे पुढे येऊ द्यावयाचे नाहीत आणि पुढे आले तर अनुल्लेखाने संपवायचे किंवा मारावयाचे.

वीर सावरकरांचे अलौकीक मोठेपण कुणीच नाकारू शकणार नाही. मात्र, निरंजन टकले यांचे त्यांच्यावरचे पुस्तक अजून मराठीत येऊ शकलेले नाही. प्रा. मदन पाटील यांचे 'अकथित सावरकर' हे पुस्तक जिजाऊ प्रकाशन पुणे यांनी 2011 साली प्रसिद्ध केले. 2013पर्यंत त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या. अनेक काळ उपलब्ध नसलेल्या त्या पुस्तकाची चौथी आवृत्ती 2018 साली निघाली. पण ते पुस्तक अजिबात चर्चेत राहिले नाही. अभीजन विचारवंत आणि वृत्तपत्रे यांनी ते पुस्तक उपेक्षेने संपविण्याचा प्रयत्न केला. या पुस्तकात वीर सावरकरांनी 1911 ते 1923 या बारा वर्षांच्या कालखंडात पाठवलेले दयेचे अर्ज सविस्तरपणे दिलेले आहेत. या दयेच्या अर्जातील भाषेत आर्जव, अजीजी आणि दिलगिरी आहे. योग्य मार्गावर येण्याची ग्वाही आहे. प्रायश्चीत्त घेण्याची भावना आहे आणि माफीदेखील आहे. परत आल्यावर इंग्रजांना अडचणीत आणणारी एकही गोष्ट त्यांनी केली नाही. या उलट इंग्रजांना अडचणीत आणणाऱ्या महात्मा गांधींना 'गांधी गोंधळ' या पुस्तकात आणि लेखात व भाषणात 'गांधाळ', 'मोहात्मा', 'देशद्रोही' अशी विशेषणे लावून त्यांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. 42चा स्वातंत्र्य लढा सुरू असताना त्याला केवळ विरोध केला नाही, तर त्याची खिल्ली उडविली आणि ब्रिटिशांच्या दृष्टीने अतिशय गरजेची असलेली 'सैन्यात शिरा'ही मोहीम राबविली.

खरंतर यामुळे सावरकरांना कमीपणा येण्याचे काहीच कारण नाही. वीर सावरकरांनाही देश स्वतंत्र करावयाचा होता. हा देश कसा स्वतंत्र करावा आणि हा स्वतंत्र देश कसा असावा, याबाबतची एक रचना त्यांच्या मनात होती. त्यांची म्हणून एक रणनीती होती. त्यामुळे त्यांच्याबद्दल अतीव आदर मनात ठेवूनही या पुस्तकावर चर्चा व्हावयास हवी होती. नीरंजन टकले यांचे पुस्तकही मराठीत यावयास हवे होते.

खरंतर हेच मध्ययुगीन मराठी संतांच्याबद्दल आहे. त्यांनी समतेचा संदेश दिला. ही सांस्कृतिक अंधश्रद्धा आपल्या मनावर पक्की बसली आहे. या संतांनी केलेले कार्य फार मोठे आहे, हे आपण सर्वांनीच मान्य केले पाहिजे. मात्र, या सर्वांनी समतेचा संदेश दिलेला नाही, तर वर्णाश्रमधर्माची घृणास्पद चौकट भयावह रीतीने बळकट केली आहे.

आपले रामदास दासबोधात सांगतात-

गुरु सकळासी ब्राह्मण, जरी तो झाला क्रियाहीन
तरी तयासची जावे शरण, अनन्यभावे
ब्राह्मण वेद मुर्तीमंत, ब्राह्मण साक्षात भगवंत
मनोकामना होती पूर्ण, विप्रवाक्ये करोनी
असो ब्राह्मण सुखर वंदीती, तेथे मानव बापुडा किती
झाला ब्राह्मण मुढमती, तरी तो जगत्बंध
अत्यंज शब्द ज्ञाता बरवा, परी तो नेऊन काय करावा
ब्राह्मणा सन्नीध पुजावा, हे तो न घडे की
ऐसे साकडे चोहीकडे, म्हणोनी प्रस्तावा पडे
नीच जातीस गुरुत्व न घडे, याकारणे

आपले ज्ञानेश्वर महाराज म्हणतात-

जे वर्णामाजी छत्र चामर, स्वर्ग जयांचे अग्रघर
मंत्र विद्येसी माहेर, ब्राह्मण जे
जे पृथ्वीतळीचे देव, जे तपोवतार सावराव
सकळ तीर्यासी दैव, प्रगटले जे,
सांगे शुद्राघरी आघवी, पक्वान्ने आहेत बरवी
ती द्विज केली सेवावी, दुर्वळु जरी जाहला

तशी आपली गिता (गिताई) 'स्त्रिया बिघडती तेव्हा, घडतो वर्ण संकर' म्हणून थांबते. खरतर पुरुष स्त्रीला बिघडवतो तेव्हा किंवा स्त्री पुरुष बिघडतात तेव्हा असे हवे. ते राहू देत. आपले ज्ञानेश्वर महाराज यांच्या पुढे गेलेत. ते ज्ञानेश्वरीत सांगतात.

उत्तम, अधर्मी संचरती, ऐसे वर्णावर्ण मिसळती,
तेथे समुळ उखडती याती धर्म

आणि याती धर्म मोडणे किती वाईट, हे सांगताना ज्ञानेश्वर महाराज सांगतात

चौहाटीचीये बळी, धावीजे सैरा काडूळी
तैसी महापापे कुळी, संचरीती

आपले एकनाथ महाराज सांगतात-

जोडीली संपदा ब्राह्मणास द्यावी, अखंड करावी चरणसेवा
ब्राह्मणाचे तीर्थ जे नर प्राशीती, सायुज्जता मुक्ती लागे पाया
एका जर्नादनी मुक्ती हे तो वाव, भक्ता हे भूदेव कोटीजन्मी

संत तुकाराम इतर संताच्यांहून अनेक योजने पुढे आहेत हे खरे - मात्र श्री. म. माटे, जे महार वस्तीत जाऊन शिकवत असत म्हणून ज्यांना महार माटे म्हणतात, त्यांनी सांगितलंय, 'गाथेत अस्पृश्यता निवारण नाही आणि बुवा सहभोजनाच्या विरुद्ध होते.' माटेंचे म्हणणे कदाचित काहींना एकांगी वाटेल.

पण गाथेत एक अभंग असा आहे-

वैष्णव तो नव्हे, ऐसी ज्याची मती
पहा श्रुतीमाजी विचारोनी
सत्य त्याचे वेळी, घडला व्यभिचार
मातेसी वेव्हार अंत्यव्याचा!

मात्र हे सारे वाचूनही आपल्या मनात मध्ययुगीन मराठी संतांच्याबद्दल राग किंवा हिनत्वाची भावना येत नाही. त्यावेळची सामाजिक चौकट आणि सामाजिक मन:स्थिती यांचा आपण विचार करतो.

म्हणजे खरं तर माहिती दडवून ठेवू नये. त्यावर साधक बाधक चर्चा करावी. ती करताना काळाची चौकट आणि त्या महानायकांच्या मनातील रचना समजावून घ्याव्यात. त्यांची रणनीती समजावून घेऊन त्यांना देश कसा घडवायचा होता, त्यावर चिंतन करावे. असे करावे त्या महनीय व्यक्तींना आपण अजिबात कमीपणा देत नसतो.

हे असं करावयास हवे. पण आपण असे करत नाही. मधोकांचे पुस्तक आपण वर पाहिले. तोच अन्याय आपण आज एका प्रचंड अभ्यासावर आधारित पुस्तकाला देतोय का? पुस्तकाचे नाव 'द फौंडेशन ऑफ टिळक्स नॅशर्नॅलिझम', लेखिका प्रा. डॉ. परिमला राव. त्या जवारहलाल नेहरु विद्यापीठात प्राध्यापक आहेत. एखाद्या महनीय व्यक्तीचा नावाचे दडपण आपल्या मनावर येऊ न देता तटस्थपणे सर्वांगीण अभ्यास कसा करावा, याचा वस्तुपाठ म्हणून हे पुस्तक उभे आहे.

खरंतर टिळकप्रेमी विचारवंतांनी याचा प्रतिसाद करावयास हवा होता. पण त्यांना त्याची गरज वाटली नाही. त्यांनी पुस्तकाला कात्रजचा घाट दाखविला. पुस्तक उपेक्षेने संपविले. पुस्तक वाचकांपर्यंत पोहचूच दिले नाही. मग चर्चेची काय गरज? आपल्याला न पटणारे, खरंतर अडचणीत आणणारे विचार कसे संपवावेत याचा वस्तुपाठ म्हणून आज हे विस्मृतीत पाठविलेले पुस्तक उभे आहे. पुस्तक 2011 मध्ये 'ओरिएंटल लाँगमन ब्लॅक स्वॅन' या प्रमुख प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केले. पुस्तक ज्यांच्या हातात पडले ते अस्वस्थ झाले. पुस्तक भिंगरीसारखे फिरेल असे वाटले. पण तीन-चार महिने पुस्तक एका मर्यादित वर्तुळात फिरत राहिले. तोवर पहिली आवृत्ती संपली किंवा संपली असे सांगण्यात आले. तीन-चार महिन्यांत पहिली आवृत्ती संपली म्हणजे लगेच दुसरी आवृत्ती यावयास हवी. पण प्रकाशकांनी पुस्तक पुन्हा प्रसिद्धच केले नाही. याचा मराठी अनुवाद तरी प्रसिद्ध व्हावा, अशी शब्द प्रकाशनच्या येशू पाटील यांची इच्छा होती. लेखिकेने त्याला परवानगी दिली. मात्र लेखिकेने प्रकाशकाला सर्व हक्क दिलेले होते. त्यांनी येशू पाटील यांच्या पत्राला उत्तरही पाठवले नाही...

या पुस्तकात असे काय आहे? टिळकांचे अलौकीक मोठेपण आपण कुणीच नाकारत नाही. पण टिळकांचा अभ्यास करणारे मराठी विचारवंत या पुस्तकाचा प्रतीवाद का करत नाहीत? हे पुस्तक प्रकाशक पुढे का आणत नाहीत? त्यावर चर्चा का होत नाही?- प्रकाशकांना झालेल्या कराराचा फायदा घेऊन पुस्तक संपविण्याचा अधिकार नाही. यावर साहित्यसंस्था चर्चा करून चळवळ का उभारत नाहीत?

पुस्तकाचे नाव 'फौंडेशन ऑफ टिळक्स नॅशर्नॅलिझम' म्हणजे 'टिळकांच्या राष्ट्रीयत्वाचा पाया' पुस्तकात काय असेल याचा अंदाज आपल्याला पुस्तकाच्या अर्पण पत्रिकेतच येतो. लेखिकेने पुस्तक अर्पण केलंय 'आपल्या दिवंगत वडिलांना आणि महाराष्ट्रातील ज्ञात आणि अज्ञात समाजसुधारकांना, ज्यांनी राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली सामाजिक आणि आर्थिक असमानता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना विरोध केलाय.' लेखिकेला काय म्हणायचंय ते प्रास्ताविकातून अधिक स्पष्ट होते. प्रास्ताविकाचे शीर्षक आहे 'एनकौंटरिंग द मिथ' म्हणजे 'दंतकथांशी सामना'. लेखिका लिहिते, 'इंग्रजांच्या विरुद्ध तडजोडी न करता झुंजारपणे लढणारा एक महानायक ही लोकमान्य टिळकांची माझ्या मनातील प्रतिमा होती. ही प्रतिमा मनात ठेऊनच मी माझ्या अभ्यासाला सुरुवात केली. मी टिळक मालक आणि संपादक असलेल्या मराठाचे अंक वाचावयास सुरुवात केली. माझ्या मनातील प्रतिमेला केवळ तडेच गेले नाहीत, तर या प्रतिमेशी अजिबात संबंध नसलेले एक वेगळे टिळक माझ्यासमोर साकार झाले. 1) टिळक राज्यकर्त्यांना पुन:पुन्हा विनंती करत होते, की सारा न भरणाऱ्या शेतकऱ्यांना तुरुंगात टाका. 2) सनातनी टिळक ब्राह्मणेत्तरांना आणि स्त्रियांना इंग्रजी शिकण्याचा अधिकार नाही असे सांगत होते. 3) माझ्या अगदी स्पष्टपणे लक्षात आले, की ब्राह्मणेत्तर आणि स्त्रिया यांना अवमानीत करून त्यांना कायम दुय्यम स्थान देणारे राष्ट्र त्यांना अभिप्रेत आहे.

माझ्या अभ्यासात त्रुटी राहू नयेत. त्याला एकांगी स्वरूप येऊ नये, म्हणून मी केसरीचे जुने अंक अभ्यासावयाचे ठरवले. मराठी माझी मातृभाषा नाही. त्यामुळे मी लेख समजावून घेताना, त्याचे भाषांतर करताना त्यात त्रुटी राहू नयेत म्हणून मी निवडलेल्या लेखांचे भाषांतर करण्याची काहीजणांना विनंती केली. काहीजणांनी लेख वाचल्यावर हे काम करण्याचे नाकारले. काहीजण म्हणाले, 'त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. या जुन्या गोष्टी आता उकरून काढू नका!' मी नाईलाजाने माझा अभ्यास फक्त मराठा वर अवलंबून ठेवला. माझ्या लक्षात आले टिळकांनी समाजसुधारणा करणाऱ्या ब्राह्मणांचीसुद्धा खिल्ली उडविली आहे. नीट पाहिले

तर केवळ दलितांच्या नव्हे तर सर्व ब्राह्मणेत्तरांच्या, मुसलमानांच्या आणि सर्व स्त्रियांच्या विरुद्ध म्हणजे 99% समाजाच्या विरुद्ध टिळक उभे आहत. मात्र फार चतुराईने टिळकांची खोटी प्रतिमा जनमानसात उभी केलेली आहे. पंचवीस वर्षे टिळक शेतकऱ्यांच्यावर अन्याय करत उभे होते. मात्र यातील काहीही न सांगता त्यांनी रयतवारीत जे काम केलंय ते फार मोठे करून सांगण्यात आलंय. चाळीस वर्षे टिळक सातत्याने स्त्रियांना आणि दलितांना नव्हे, तर ब्राह्मणेत्तरांनाही शिक्षणाचा अधिकार नाही, म्हणून सांगत होते. त्याबद्दल कुणीच काही का बोलत नाही?

म्हणजे अगदी भर मिरवणुकीत राजा नागडा म्हणून सांगण्यासारखे नसले तरी पुस्तकातील प्रत्येक पानात आपल्या मनातील टिळकांची प्रतिमा मलीन करण्याचे सामर्थ्य आहे. - म्हणजे खरंतर या पुस्तकावर चर्चा व्हावयास हवी. त्यातील भरभक्कम संदर्भांच्यावर आधारलेल्या माहितीचा प्रतिवाद व्हावयास हवा. मात्र, विचार हा आमच्या अस्तित्वाचा आधार आहे, म्हणून सांगणारा महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील विचारवंत हे पुस्तक उपेक्षेने मारण्याचा प्रयत्न का करताहेत?

पुस्तक एकूण 369 पानी आहे. वैचारिक मांडणी आणि बांधणी चिरेबंदी करणारी आठ प्रकरणे पुस्तकात आहेत. नंतर समारोपाचे एक प्रकरण आहे. शब्दांचे अर्थ म्हणजे 'ग्लॉसरी' देणारी दोन पाने आहेत. संदर्भसूची म्हणजे बिबिलिओग्राफी 34 पानांची आहे. त्याशिवाय प्रत्येक प्रकरणाच्या खाली विपुल संदर्भ आहेत. प्रकरणांची नावे आणि प्रत्येक प्रकरणाखाली असलेल्या संदर्भाची संख्या लक्षात घेतली, तर पुस्तकाचा आवाका आणि केलेला अभ्यास आपल्या लक्षात येतो.

1) टिळकांची स्थानिश्चिती (सिच्युएटिंग टिळक) - पाने 53, संदर्भ 247

2) सावकार हा देव आहे शेती व्यवसायाचा (मनीलेंडर इज ए गॉड ऑफ ॲग्रीकल्चर) - पाने 41, संदर्भ 201

3) रकमाबाई आणि रमाबाई शिकलेल्या स्त्रिया (एज्युकेटेड वुमेन रकमाबाई आणि रमाबाई) - पाने 41, संदर्भ 176

4) जात, शिक्षण आणि सामाजिक स्थान (एज्युकेशन कास्ट ॲण्ड आयडेंटेटी)- पान 41, संदर्भ 141

5) निर्मीती शत्रूंची (इनव्हेंन्टीग एनिमी) - पाने 41, संदर्भ 195

6) आंदोलन स्वदेशीचे (द स्वदेशी मुव्हमेंट) - पाने 36, संदर्भ 182

7) जात, लिंग आणि शिक्षण (जेंडर कास्ट ॲण्ड एज्युकेशन) - पाने 39, संदर्भ 153

8) टिळकांचा राष्ट्रवाद आणि हिंदूत्व (टिळक्स नॅशर्नॅलिझम ॲण्ड हिंदुत्व) - पाने 38, संदर्भ 187

9) समारोप (कनक्ल्युजन्स) - पाने 5, संदर्भ 8

प्रत्येक प्रकरणात नव्हे तर प्रत्येक पानावर 'आर.डी. एक्स' भरलंय! मात्र, सध्या कॉपीराईटच्या प्रश्नाबाबत काही प्रकाशक फारच संवेदनशील आहेत. ते साध्या साध्या गोष्टी फार गंभीरपणे घेतात. म्हणजे परिक्षण करतानाही आपण पुस्तकातील माहिती वापरली तर फट म्हणता ब्रह्महत्या होईल. त्यामुळे वानगीदाखल फक्त दोन तीन उदाहरणे संदर्भासकट घेतोय. ही उदाहरणे या पुस्तकात आहेत, पण इतरत्रही आलेली आहेत. मी सांगतोय ती इतर ठिकाणी आलेली. हे पुस्तक त्यांना दुजोरा देते.

आपल्याला माहिती आहे. वीर सावरकर म्हणाले होते, 'शिवाजी महाराजांनी कल्याणच्या लुटीत हातात आलेली सुभेदाराची सून सन्मानाने परत पाठविली. हे मला प्रचारणीय व आदरणीयही वाटत नाही. त्या तरण्याबांड पोरीला परत पाठवायचे म्हणजे शत्रूची वीण वाढवायला सहाय्य करण्यासारखे होते. त्यांनी ती आपल्या एखाद्या हुजऱ्याला देऊन आपली वीण वाढवायला हवी हाती. मात्र समस्त स्त्री जातीची विटंबना करणारी भाषा मराठात पुन:पुन्हा पानोपानी येते. पंडिता रमाबाई म्हणजे स्त्री शक्तीचा जीता-जागता जागर, मात्र त्यांच्याबद्दल मराठाच्या 10 जानेवारी, 1904च्या अंकात पान 18 व 19 वर आलेली ही वाक्ये पाहा- '...But not so when she thought of Christ, he revealed himslf to her in one right. No doubt the revelations of a right must always be very romantic in the case of an enthusiastic and intresting woman like Pandita, but never do they appear to have given out so much romance as in the case of Christ and Pandita.'

या वाक्याचे भाषांतर करून मराठी भाषा दुषीत न करता आपण त्यांनी याबाबत आणखी काय म्हटलंय हे पाहुया. त्यांनी पुढे म्हटलंय, 'रमाबाईंच्या वडिलांनी त्यांना संस्कृत आणि इंग्रजी शिकवून धर्माज्ञा मोडून पाप केलंय' स्त्री शिक्षणाला कडाडून विरोध करीत टिळक उभे होते. पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू झाली, त्यावेळी त्याविरुद्ध त्यांनी चळवळ उभारली. 31 ऑगस्ट, 1884च्या 'मराठा'त त्यांनी लिहिले, 'हे शिक्षण मिळाले तर मुली आपले स्त्रीपण विसरतील आणि इंग्रजी शिकल्यावर त्या नवऱ्यांच्या डोक्यावर बसतील.' होणारा विरोध पाहून त्यांनी 7 सप्टेंबर, 1884 मराठात थोडी सूट दिली. त्यांनी लिहिले, 'शिकवायचेच असेल तर शिकवा मुलींना! पण त्यांच्या बुद्धीला झेपेल असे शिक्षण द्या. इतिहास, इंग्रजी, गणित आणि विज्ञान हे त्यांच्या कुवतीबाहेरचे असलेले

विषय त्यांना शिकवू नका.' आणि आर्यांच्या जन्मस्थानासारखेच एक टाळीचे वैज्ञानिक वाक्य त्यांनी त्यात टाकलंय. त्यांनी लिहिलंय, 'एक इंग्रज शास्त्रज्ञ म्हणालाय, मुलींच्या मेंदूचे वजन, मुलांच्या मेंदूच्या वजनापेक्षा 15 ग्रॅमनी कमी असते.' हे सारे पुरेसे नाही, हे लक्षात येऊन पुढे धार्मिक अंधश्रद्धा पसरवल्यात. मुली शिकल्या तर त्यांना वैधव्य येईल, हे शास्त्रवचन आहे, म्हणून सांगितले.

स्त्रियांच्या शिक्षणापेक्षा अधिक कडवा आणि कडवट विरोध त्यांनी शूद्रांच्या शिक्षणाला केला. 26 मार्च 1882च्या मराठामध्ये त्यांनी लिहिलंय, 'अस्पृष्यांना शिक्षण देणे आणि सरकारने त्यावर खर्च करणे चुकीचे आहे. आमच्या धार्मिक गोष्टीत सरकार हस्तक्षेप करणार नाही, म्हणून आमच्या राणीने आम्हाला वचन दिलंय.' आणि 20 सप्टेंबर 1885 रोजी मराठात त्यांनी लिहिले 'महार धेंड यांच्या मुलांच्या बरोबर शाळेत ब्राह्मण मुलांना बसविण्याचा जो प्रकार सुरू झालाय तो थांबला पाहिजे.'

शुद्रांच्या शिक्षणाला विरोध करणे, हा एक कुटील डावपेचाचा भाग होता. लखनौ करार केल्यावर त्यांनी 18 सप्टेंबर, 1917 रोजी केसरीमधील अग्रलेखात लिहिले, 'मुसलमानांना आरक्षण दिलेत, आता तसे ब्राह्मणेत्तरांना कधी देणार म्हणून लोक विचारताहेत. आम्ही त्यांना सांगू इच्छितो, ब्राम्हणेत्तर मुसलमान पण आलेच! त्यातून या इंग्रजी राज्यात धर्माज्ञा मोडून सर्वांना शिक्षण मिळतय. अनेक जातींमधील अनेक लोकांची स्थिती गरीब बिचाऱ्या ब्राह्मणांपेक्षा चांगली आहे. त्यांचे पैसे मिळविण्याचे उद्योग त्यांच्याकडे आहेत. नोकरी सोडून पैसे मिळविण्याचा दुसरा उद्योग ब्राह्मणांच्याकडे नाही. त्यामुळे निवडणूकीत उभे रहावयाचे की नाही आणि मतदानाचा हक्क असावा, की नसावा हे प्रत्येक व्यक्तीच्या शैक्षणिक यत्तेवर आणि तो सरकार देणी किती देतो, यावर ठरवून हा प्रश्न सोडवून टाकावा!'- शाहू महाराज नोकरीत आरक्षण देत होते. त्याला स्पर्षही न करता टिळक फक्त मतदानाचा हक्क आणि निवडणूकीत उभे राहण्यासाठी हवी असलेली पात्रता याबाबत बोलत होते.

ते असो! आपण वर पाहिलेल्या रमाबाई प्रकरणापेक्षा रकमाबाई प्रकरण भयंकर आहे. नवरा व्यसनी, बदफैली आहे आणि मारहाण करतो म्हणून त्या बाईंनी नांदावयास जावयास नाकारले. या गाजलेल्या खटल्यावर 27 मार्च, 1887 रोजी मराठामध्ये त्यांनी लिहिले 'ही बाई एक फार भयंकर गोष्ट करते आहे. 'Hindu religion is so strict that even under croel treatment wives pull on with their husband... if Rakmabai refused to join her husband she should go to jail.'

नवरा बदफैली आहे, मारहाण करतो, पण म्हणून ही बाई

शब्द PUBLICATION



₹ ३५०/-

राजीव नाईक ह्यांनी नाटकं वाचली, पाहिली, शिकवली, लिहिली आणि केली. त्यांनी पाहिलेल्या–वाचलेल्या नाटकांशी शारीरिक-मानसिक-बौद्धिक पातळीवर मनस्वीपणे नातं जोडू पाहाण्याच्या त्यांच्या प्रयत्नात त्यांना अनेक नाटकं लागली. 'घाशीराम कोतवाल' लागलं तसं 'ऑथेलो'ही; 'बेगम बर्वे' लागलं तसं 'शारदा'ही. ही नाटकं का व कशी लागली ह्याचा संहितेच्या आधारानं काटेकोरपणे शोध घेताघेता त्यांचा अर्थ त्यांच्या अधिकाधिक हाती येत गेला.

त्यांचा प्रत्येक नाटकाकडं पाहाण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. नाटकाचा कधी समग्र विचार केला आहे, तर कधी एकाच अंगावर लक्ष केंद्रित केलं आहे. प्रत्येक लेखात आपल्याला लेखकाच्या व्यासंगाबरोबर, त्याचं व्यक्तिमत्त्व जाणवत राहतं. हे व्यक्तिमत्त्व आणि ते ज्या ताजेपणानं व्यक्त होतं, त्यातून ह्या लेखनाविषयी एक प्रकारचं ममत्व निर्माण होतं.

नाट्यकलेतील आप्ताचा संवेदनशील आपलेपणा, तीक्ष्ण बुद्धीच्या समीक्षकाचा निकोप दृष्टिकोन, मिष्कील मार्मिकता, संदर्भक्षेत्राचा व्यापक विस्तार, भाषेची सर्जनशील लवचीकता, वातड पंडिती परिभाषेची गैरहजेरी, ह्या सर्वांमुळं आपण उद्दीपित मन:स्थितीत 'लागलेली नाटकं' हा नाट्यलेखसंग्रह वाचत जातो आणि वाचतच राहतो.

– शांता गोखले

नवर्याकडे नांदावयास जाण्याचे नाकारत असेल, तर तिने तुरुंगात जावे, असे सांगणारे टिळक याच्याही पुढे गेलेत. विजयालक्ष्मी ही एक अजाण, केशवपन झालेली विधवा. नातेवाईकांनी तिच्या पोटात मूल टाकले. त्या मुलीने त्या नवजात बालकाचा मृत्यू घडवून आणला, असे मानून सुरत येथील कोर्टात तिला मृत्युदंडाची शिक्षा दिली. उच्च न्यायालयाने ती जन्मठेपेची केली. मुंबई सरकारने ती दया म्हणून पाच वर्षांची केली. मात्र, 21 मे, 1881 रोजी मराठाने त्याला विरोध केला. 'या अशा भयंकर कृत्याला मृत्युदंड ही एकमेव शिक्षाच योग्य आहे, म्हणून लिहिले. त्यांनी सरकारला 'आमच्या धर्मात लुडबुड करू नका.' असे सांगून संमतीवयाच्या कायद्याला विरोध केला, हे आपणाला माहीत आहे. मात्र, आपणाला माहित नसलेल्या अनेक गोष्टी आहेत. 13 नोव्हेंबर, 1892 रेजी त्यांनी मराठात लिहिले आहे, 'सरकारने न्यायालयांना सांगितले पाहिजे, की जात पंचायती जातीची बंधने पाळत आहेत, की नाहीत हे न्यायालयांनी पाहिले पाहिजे.'

सामाजिक सद्भाव टिकावा. मशिदी समोरून जाताना वाद्ये वाजवू नका, असे आवाहन सरकारने केल्यावर 20 मे, 1894 रोजी त्यांनी मराठ्यात लिहिले, 'हा हिंदूंचा हक्क आहे आणि त्यांनी तो सोडता कामा नये.' सरकारने कुलकर्णी अकार्यक्षम आहेत आणि ते मनमानी करून रयतेला पिळतात म्हणून कुलकर्णी वतन रद्द करून तेथे सनदी अधिकारी नेमण्याचे ठरविले. 19 मे, 1895 रोजी मराठा मध्ये त्यांनी कुलकर्णी वतन नाहीसे करणे चुकीचे म्हणून बाजू मांडली. शेतकर्यांच्या कर्जमाफीला त्यांनी कडाडून विरोध केला. ते येथेच थांबले नाहीत, तर सावकारांचे कर्ज बुडविणार्या शेतकर्यांना तुरुंगात टाका म्हणून सांगितले.

राष्ट्रीयत्वाच्या त्यांच्या कल्पना विलक्षण होत्या. या देशात एकवेळ मद्रासी, पंजाबी, बंगाली, मराठी अशी वेगवेगळी राष्ट्रे होती. त्यांचे प्राक्तन एकवेळ वेगळे होते आणि उद्याही वेगळे असेल, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रपुरुष म्हणून शिवाजी महाराजांचीच जयंती का? बंगालमधील प्रतापदित्यांचे काय? असा प्रश्न पुढे आल्यावर 21 जून, 1903 रोजी मराठा मध्ये त्यांनी लिहिले, 'I never intended that Shivaji could be a hero for all different nationalities in India.'

आम्ही बाहेरून आलेले आर्य आहोत आणि हा देश मोंगल आक्रमणाच्या आधी आम्ही जिंकलाय म्हणून त्यांनी अभिमानाने सांगितले आहे. 15 जानेवारी, 1911 रोजी त्यांनी मराठात लिहिले, 'The Hinduj being Aryans were the original conquerors of India before the Mohammedians... were originally the inhabitants of the North Pole.' त्यामुळे आर्यांच्या आणि ब्राह्मणांच्या प्रत्येक गोष्टीचे कौतुक आणि उदात्तीकरण करत आणि त्याला बळकटी आणत ते आजन्म उभे राहिले.

त्यांनी तुकारामांची मराठी भाषा नाकारली. 27 मार्च, 1887 रोजी त्यांनी मराठात लिहिले, 'आपल्याला प्राकृत मराठी नकोय. आपल्याला संस्कृताधिष्ठीत मराठी भाषा पाहिजे आहे. कारण केवळ अशीच मराठी भाषा जगातील अद्ययावत ज्ञान सामावून घ्यावयास सक्षम असेल.' गंमत पाहा- तेल्या तांबोळ्यांना शिक्षण देऊ नका. त्यांची भाषा नाकारा, असे म्हणणार्या टिळकांना त्यांच्या बिलंदर अनुयायांनी लोकमान्य आणि तेल्या तांबोळ्यांचा नेता म्हणून जाहीर केले!

हे पुस्तक असे अनेक ज्वालाग्राही मुद्दे बरोबर घेऊन उभे आहे. त्याचप्रमाणे केसरी मधीलही लेखिकेने निवडलेले लेख आपणासमोर यावयास हवेत.- आपल्याला लोकमान्य टिळकांचे अलौकीक मोठेपण नाकारायचे नाही. त्यांचा अपमान तर मुळीच करावयाचा नाही. पर काळाच्या ज्या चौकटीत ते काम करीत होते. ती चौकट एकाच वेळी, अगदी पूर्णपणे वेगळी मानसिकता असलेल्या समाजगटांचे संघटन करीत. त्यांचे नेतृत्व करताना होणारी त्यांची दमछाक आणि त्या धडपडीत स्वातंत्र्य मिळवून देश निर्माण करण्याची त्यांची रचना समजावून घ्यावयाची आहे.

म्हणून महाराष्ट्रातील विचारवंतांनी, प्रामुख्याने टिळकप्रेमी विचारवंतांनी या पुस्तकावरील अलिखित बंदी उठविण्याचा प्रयत्न करावयास हवा. या पुस्तकाने मराठी भाषांतर उपलब्ध करावयास हवे. त्यानंतर या पुस्तकावर चर्चासत्रे घडवून त्याचा प्रतिवाद करणारे पुस्तक, गेला बाजार, किमान पुस्तिका बाहेर यावयास हवी. विचारांचा मुकाबला विचारांनी करावयाचा असतो. विचार थांबवून वा डावलून नव्हे. लोकमान्य टिळक स्मृतीशताब्दी आपण नुकतीच, कोरोना काळातही साजरी केली. लोकसत्ता, साधना, नवभारत यांनी लोकमान्यांवर स्तुतीसुमने उधळणारे लेख प्रसिद्ध केले. एकानेही दहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाचा चुकूनही उल्लेखसुद्धा केला नाही. विचार विचाराने संपविता येतो उपेक्षेने नव्हे. नाहीतर राजा नागडा म्हणून सांगत हे पुस्तक असेच उभे असेल- प्रचंड शिस्तबद्ध अभ्यासावर आणि रेखीवपणे लिहिलेल्या या पुस्तकाचे आज जे काही होते आहे, ते पाहून लेखिकेला काय वाटत असेल, याची कल्पना नाही. कदाचित त्यांच्याही मनात बलराज मधोक यांचा विश्वास असेल! मधोक म्हणाले होते, 'विचार उपेक्षेने वा उपाहासाने संपविता येत नाही. हे सांगत आम्हाला आधार देत चार्वाक उभा आहे..'

दत्तप्रसाद दाभोळकर
dabholkard@dataone.in